खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे

# हुतात्मा राजगुरू महाविद्यालय

राजगुरुनगर, ता. खेड, जि. पुणे

## प्रसिद्धी विभाग

## शैक्षणिक वर्ष : २०२५ – २६

### मराठी विभाग : शैक्षणिक सहल सातारा

लोकमत

# साहित्य संमेलनात विद्यार्थ्यांनी घेतला शब्द, विचार आणि संस्कृतीचा आनंद

लोकमत न्यूज नेटवर्क

**राजगुरूनगर :** सातारा येथे संपन्न झालेल्या शतकपूर्व ९९ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनास हुतात्मा राजगुरू महाविद्यालयातील मराठी विभागाच्या पदव्युत्तर व पीएच.डी. संशोधन केंद्रातील विद्यार्थ्यांनी भेट देऊन 'शब्द', विचार आणि संस्कृतीचा उत्सव अनुभवला.

संमेलनातील विविध उपक्रम जाणून घेतले. ग्रंथविक्री दालनाला भेट देऊन पुस्तके हाताळली. साहित्यिकांचा त्यांच्या साहित्यासह आढावा घेतला. संमेलनस्थळी विविध मुलाखती, कविकट्टा आणि परिसंवादांचा आनंद घेतला. या संमेलनाचे अध्यक्ष ज्येष्ठ लेखक विश्वास पाटील यांचीही विद्यार्थ्यांनी भेट घेतली. विद्यार्थ्यांशी संवाद साधताना त्यांनी वाचनसंस्कृतीचा संस्कार स्वतःवर करण्यासाठी विद्यार्थ्यांनी पुस्तकांच्या सहवासात राहण्याचे आवाहन केले.



संमेलनाध्यक्ष विश्वास पाटील यांच्यासह डॉ. संजय शिंदे व इतर प्राध्यापक.

## विश्वकोश निर्मितीचे कार्य घेतले समजून

विद्यार्थ्यांनी खरेदी केलेल्या पुस्तकांवर त्यांनी स्वाक्षरी केली. या संमेलनाच्या निमित्ताने साहित्य शारदेच्या उत्सवात सहभागी झाल्याबद्दल विद्यार्थ्यांनी आनंद व्यक्त केला.या शैक्षणिक सहलीत विद्यार्थ्यांनी वाई येथील प्रज्ञा पाठशालेला भेट दिली तसेच महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळाच्या कार्यालयाला भेट देऊन मराठी भाषा आणि मराठी संस्कृतीच्या संवर्धनासाठी आणि प्रसारासाठी विश्वकोश निर्मितीचे कार्य समजून घेतले. या शैक्षणिक सहलीचे आयोजन प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे, उपप्राचार्य व मराठी विभागप्रमुख डॉ. संजय शिंदे, डॉ. बाळासाहेब अनुसे, प्रा. पार्थ खाडीलकर, प्रा. ओंकार टाकळकर यांनी केले.

Hello Pune Gramin
Page No. 3 Jan 09, 2026
Powered by: erelego.com

पुढारी

संक्षिप्त




**सातारा येथे झालेल्या साहित्य संमेलनात हुतात्मा राजगुरू महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला.**

## साहित्य संमेलनास विद्यार्थ्यांची भेट

**खेड :** सातारा येथे पार पडलेल्या ९९व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनास हुतात्मा राजगुरू महाविद्यालयाच्या मराठी विभागातील पदव्युत्तर व पीएच.डी. संशोधन केंद्रातील विद्यार्थ्यांनी भेट देत शब्द, विचार आणि संस्कृतीचा उत्सव अनुभवला. विद्यार्थ्यांनी संमेलनातील विविध उपक्रमांची माहिती घेतली तसेच ग्रंथविक्री दालनाला भेट देऊन विविध साहित्यकृतींचा आस्वाद घेतला. संमेलनस्थळी आयोजित मुलाखती, कवीकट्टे आणि परिसंवादांचा विद्यार्थ्यांनी मनमुराद आनंद घेतला. यावेळी संमेलनाचे अध्यक्ष ज्येष्ठ लेखक विश्वास पाटील यांचीही विद्यार्थ्यांनी भेट घेतली. साहित्यशारदेच्या या उत्सवात सहभागी झाल्याबद्दल विद्यार्थ्यांनी समाधान आणि आनंद व्यक्त केला. या शैक्षणिक सहलीदरम्यान विद्यार्थ्यांनी वाई येथील प्राज्ञपाठशालेला भेट दिली. तसेच महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळाच्या कार्यालयास भेट देऊन मराठी भाषा व संस्कृतीच्या संवर्धनासाठी सुरू असलेल्या विश्वकोश निर्मितीच्या कार्याची माहिती घेतली. या शैक्षणिक सहलीचे आयोजन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे, उपप्राचार्य व मराठी विभागप्रमुख डॉ. संजय शिंदे, डॉ. बाळासाहेब अनुसे, प्रा. पार्थ खाडीलकर आणि प्रा. ओंकार टाकळकर यांनी केले.

केसरी

– किरण खुडे (पत्रकार) –

# संमेलनात विद्यार्थ्यांनी घेतला शब्द, विचार आणि संस्कृतीचा आनंद

**राजगुरुनगर, (वार्ताहर) :** येथील हुतात्मा राजगुरु महाविद्यालयातील मराठी विभागाच्या पदव्युत्तर व पीएच.डी. संशोधन केंद्रातील विद्यार्थ्यांनी सातारा येथे संपन्न झालेल्या शतकपूर्व ९९ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनास भेट दिली. विद्यार्थ्यांनी यावेळी शब्द, विचार आणि संस्कृतीचा उत्सव अनुभवला. संमेलनातील विविध उपक्रम जाणून घेतले. ग्रंथ विक्री दालनाला भेट देऊन पुस्तके हाताळली. तसेच साहित्यिकांचा त्यांच्या साहित्यासह आढावा घेतला.




संमेलन स्थळी विविध मुलाखती, कवीकट्टा आणि परिसंवादांचा आनंद घेतला. या संमेलनाचे अध्यक्ष ज्येष्ठ लेखक विश्वास पाटील यांचीही विद्यार्थ्यांनी भेट घेतली. विद्यार्थ्यांशी संवाद साधताना त्यांनी वाचनसंस्कृतीचा संस्कार स्वतःवर करण्यासाठी विद्यार्थ्यांनी पुस्तकांच्या सहवासात राहण्याचे आवाहन केले. विद्यार्थ्यांनी खरेदी केलेल्या पुस्तकांवर त्यांनी स्वाक्षरी केली. या संमेलनाच्या निमित्ताने साहित्यशारदेच्या उत्सवात सहभागी झाल्याबद्दल विद्यार्थ्यांनी आनंद व्यक्त केला.

या शैक्षणिक सहलीत विद्यार्थ्यांनी वाई येथील प्राज्ञपाठशाळेला भेट दिली तसेच महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळाच्या कार्यालयाला भेट देऊन मराठी भाषा आणि मराठी संस्कृतीच्या संवर्धनासाठी आणि प्रसारासाठी विश्वकोश निर्मितीचे कार्य समजून घेतले. या शैक्षणिक सहलीचे आयोजन डॉ. शिरीष पिंगळे, डॉ. संजय शिंदे, डॉ. बाळासाहेब अनुसे यांनी केले.

डॉ. संजय शिंदे
प्रसिद्धी विभाग प्रमुख